स्मरणिका, आकाशवाणी विज्ञान मेळावा १९८५, मूळजी जेठा महाविद्यालय

# " खगोलशास्त्रातुन मिळणारा वैज्ञानिक दृष्टिकोन "

( आकाशवाणी जळगाव, मुंबई व मु. जे. महाविद्यालय जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान-सम्मेलनातील भाषणाचा सारांश )



डॉ. जयंत नारळीकर
( आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विख्यात भारतीय खगोलशास्त्रज्ञ आणि समारंभाचे प्रमुख अतिथी )

'खगोल शास्त्र' ही विज्ञानाची शाखा, आकाशातील तारकांच्या निरीक्षणांतून जन्माला आली. आपल्यापासून पुष्कळ दूर असलेले तारे का प्रकाशतात, ग्रहांचा प्रवास दिसतो तसा अनियमीत आहे का, धूमकेतूंचे काय महत्व आहे, वगैरे प्रश्न मानवाला ज्याप्रमाणे अंधविश्वासाकडे प्रवृत्त करतात, त्याच प्रमाणे त्याला विचार करायला ही भाग पाडतात.

आपल्या सभोवताली पसरलेल्या अफाट विश्वात अनेक चमत्कार घडतांना आपल्याला दिसतात, कारण खगोल-निरीक्षणाची माध्यमे प्रगत तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन दिवसें दिवस अधिकाधिक कार्यक्षम होत आहेत. परंतु हे चमत्कार अनाकलनीय नसून मानवाच्या वाढत्या वैज्ञानिक पल्ल्यात बसणारे आहेत. प्रथम दर्शनी विचित्र वाटणाऱ्या घटनांचे आकलन नंतर विज्ञानाच्या चौकटीत करता येते हे खगोलशास्त्राचा इतिहास सांगतो.

अर्थात् हा वैज्ञानिक दृष्टिकोन रुजायला अनेक शतकांचा काळ गेला. विज्ञान तटस्थ असले तरी त्याचा वापर करणारे व त्यांत संशोधन करणारे तटस्थ नसतात. त्यांचे पूर्वग्रह विज्ञानाच्या प्रगतीला वेडी वाकडी वळणे लावतात. तरी शेवटी वैज्ञानिक दृष्टिकोनच टिकाऊपणा दाखवतो. खगोलशास्त्राने आपल्या ज्ञानात टाकलेली भर आपल्याला हा दृष्टिकोन किती महत्वाचा आहे हे दाखवते.

* * *